# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.02.2026** **वारः शुक्रवार**

---

1. अर्थसंकल्पोत्तर वेबिनारच्या मालिकेतील पहिल्या सत्रात आज पंतप्रधानांचे संबोधन
2. भारत आणि इस्रायलदरम्यान विविध क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार
3. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आज राजस्थानमध्ये जैसलमेर इथं आज वायू शक्ती सराव
4. भू-राजकीय तणावांना भारत समर्थपणे तोंड देत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं प्रतिपादन आणि
5. टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताची झिम्बाब्वेवर 72 धावांनी मात

**अर्थसंकल्प वेबिनार**

विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, सुधारणा आणि निधीची तरतूद या विषयावर आयोजित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करणार आहेत. या परिषदेत भांडवली खर्च, पायाभूत सोयीसुविधा, बँकिंग क्षेत्रातील सुधारणा, आर्थिक क्षेत्राची बांधणी, भांडवली बाजार बळकट करणे आणि कर सुधारणांमधून जीवन सुलभता आदी विषयांवर पंतप्रधान भाष्य करणार आहेत. अर्थसंकल्पोत्तर वेबिनारच्या मालिकेतील हा पहिला वेबिनार आहे. या मालिकेत केंद्रीय अर्थसंकल्पातील विविध विषयसूत्रांवर आधारित वेबिनार होणार आहेत. दरम्यान, पंतप्रधान काल इस्रायलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावरून मायदेशी परतले.

**इस्रायल भारत**

भारत आणि इस्रायलदरम्यान काल सांस्कृतिक देवाणघेवाण, मत्स्यपालन आणि सागरी जीव संस्कृती, युपीआय आणि प्रगत शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यांसह अनेक क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्यात, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यातील प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चेनंतर हे सामंजस्य करार झाले. चर्चेनंतर जारी करण्यात आलेल्या निवेदनामध्ये भारत-इस्रायल यांच्यातील परस्परसंबंध हे प्रगाढ विश्वास, सामायिक लोकशाही मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता या पायावर आधारित असल्याचे नमूद केलं आहे. दोन्ही देशांनी काळाच्या कसोटीवर टिकलेल्या विशेष धोरणात्मक भागीदारीचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असल्याचेही म्हटले आहे. दोन्ही देशांदरम्यान, महत्त्वाच्या आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये भागदारी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे एआय, क्वाटंम तंत्रज्ञान आणि महत्त्वाच्या खनिजे या क्षेत्रात सहकार्याला गती मिळेल असेही पंतप्रधानांनी यामध्ये नमूद केलं. दोन्ही देशांनी प्रसारित केलेल्या संयुक्त निवेदनामध्ये ऑक्टोबरमध्ये इस्रायलवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तसंच जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यात भारतीय पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तसंच नोव्हेंबरमधील दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. जागतिक शांतता आणि सुरक्षितता वृद्धिंगत करण्यासाठीच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार उभय नेत्यांनी केला.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राजस्थानमध्ये जैसलमेर इथं वायू दलाच्या वायू शक्ती या सरावाला उपस्थित राहाणार आहे. मुर्मू यांचं काल जैसलमेर इथं दोन दिवसांच्या राजस्थान दौऱ्यावर आगमन झालं. या दौऱ्यात राष्ट्रपती स्वदेशी बनावटीच्या हलक्या लढाऊ हेलिकॉप्टर प्रचंड चे उड्डाण करतील अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. दोन विमानांच्या साथीनं हे उड्डाण पार पडणार आहे. प्रचंड हे देशातील पहिले स्वदेशी आरेखित आणि हिंदुस्थान एअरोनॉटिक्सने विकसित केलेले

हेलिकॉप्टर आहे. या दौऱ्यात, राष्ट्रपती भारत पाकिस्तान सीमेजवळील पोखरण फील्ड फायरिंग रेंज इथं भारतीय हवाई दलाच्या वायू शक्ती या मोठ्या प्रात्यक्षिक सरावाला उपस्थित राहाणार आहेत. यामध्ये हवाई दलाची विविध विमाने त्यांच्या क्षमतेचे प्रदर्शन करणार आहे. या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा देखील उपस्थित राहाणार आहेत.

**आयआयएमसी**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन आयआयएमसी चा 57 वा दीक्षांत समारंभ उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत दिल्लीत आज होणार आहे. आयआयएमसीचे कुलपती, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. संस्थेच्या सर्व सहा संकुलांतील विविध अभ्यासक्रमांमधील सर्वोच्च गुण मिळवणाऱ्यांना 35 पदके प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते नव्या शैक्षणिक संकुल आणि वसतिगृह संकुलाची पायाभरणी करण्यात येणार आहे. तसेच वैष्णव यांच्या हस्ते इन्क्युबेशन सेंटरमधील क्रिएटर्स लाउंजचे उद्घाटन देखील करण्यात येणार आहे.

**जयशंकर-पुणे**

सध्याचं दशक हे अशांततेचं दशक आहे. मात्र, भारताने आपल्या मुत्सद्दी, संयत आणि व्यावहारिक धोरणांद्वारे या आव्हानांना तोंड दिलं आहे, असं केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हंटलं आहे. पुणे आंतरराष्ट्रीय केंद्राने काल आयोजित केलेल्या, 'आशिया आर्थिक संवाद' अर्थात 'एशिया इकॉनॉमिक डायलॉग'च्या नवव्या आवृत्तीत, त्यांचा ध्वनीमुद्रित संदेश सादर करण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर क्षेत्र, डेटा, मूल्यवान खनिजे आदि आता केवळ वृद्धीचे घटक नसून, राष्ट्राच्या मजबुतीतील महत्वाची साधनं बनली असल्याचं त्यांनी सांगितलं. नुकत्याच झालेल्या ए आय समिट मुळे भारताच्या  डिजिटल क्षेत्रातील क्षमता अधोरेखित झाल्या आहेत असं ते पुढे म्हणाले. या एशिया आर्थिक संवादात कर, तंत्रज्ञान, धोरणात्मक सुसंवादासह भू-आर्थिक विकासावर चर्चा होईल अशी अपेक्षा जयशंकर यांनी व्यक्त केली.

**भारत-केनिया**

भारत आणि केनिया यांच्यातील संयुक्त संरक्षण सहकार्य समितीची चौथी बैठक काल झाली. त्यामध्ये संरक्षण संशोधन, विकास आणि उत्पादन यामध्ये सहकार्याला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं. या चर्चेदरम्यान, सेवा सहभाग वाढवणे, प्रशिक्षण संधी वाढवणे, सागरी सुरक्षा सहकार्य बळकट करणे यांवरही चर्चा करण्यात आली. उभय देशांनी नौदलांदरम्यान संवाद सुरू करण्यासह परस्पर सेवा सहभागाची व्याप्ती वाढवण्यावरही सहमती दर्शवली. मागील बैठकीनंतर झालेल्या प्रगतीविषयी उभय देशांनी समाधान व्यक्त करताना, संरक्षण सहकार्य अधिक सखोल आणि विस्तारित करण्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीचा पथदर्शी आराखडा तयार करण्यासह इतरही अनेक मुद्द्यांवर सहमती दर्शवली.

**बंदरे**

बंदर, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयानं पारादीप बंदरावर हरित हायड्रोडन, अमोनिया आणि इतर द्रव पदार्थ वाहणाऱ्या कार्गो जहाजांच्या हाताळणी करण्याच्या उद्देशाने गोदीच्या विकासासाठी 797 कोटी रुपयांपेक्षा अधिकच्या विकास कामाला मान्यता दजिली आहे. पारादीप बंदर प्राधिकरणाकडून बांधा-वापरा-हस्तांतरित करा या तत्वावर राबवण्यात येणार आहे. यामुळे केवळ मोठ्या कार्गो क्षमता वाढणार नसून, पूर्व भारतात रोजगार निर्मिती आणि हरित ऊर्जा परिसंस्था निर्मितीला चालना मिळे असं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले.

**श्रीलंका-पंतप्रधान**

श्रीलंकेचे पंतप्रधान हरिणी अमरासुरिया यांनी भारतासोबतचे सहकार्य अधिक दृढ करण्यासठी वचनबद्धत असल्याची पुष्टी करताना, बळकट व्यावसायिक संबंध, उच्च गुंतवणूक आणि वाढत्या संख्येतील भारतीय पर्यटकांचे स्वागत केले आहे. भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिन आणि श्रीलंकेच्या 78 व्या स्वातंत्र दिनानिमित्त आयोजित एका सहभोजनावेळी ते

उपस्थितांना संबोधित करत होते. भारतीय व्यावसायिक संबंध आणि पर्यटनाच्या माध्यमातून परस्पर लोकसंबंधांसाठी उत्सुक असल्याचंही अमरसुरिया यांनी म्हटलं आहे.

**<u>कॅनडा पंतप्रधान-भारत दौरा</u>**

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नें आजपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. आज त्यांचं मुंबईत आगमन होणार आहे, असं परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हंटलं आहे. आजपासून पुढील दोन दिवस ते विविध कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, उद्योजक, अर्थतज्ञ, नवोन्मेशक, शिक्षणतज्ञ तसंच यांच्या भेटी घेणार आहेत. 1 मार्चला ते नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतील. उभय नेते भारत आणि कॅनडातील धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील तसंच, व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, मूल्यवान खनिजे, कृषि, शिक्षण, संशोधन आणि परस्पर सहकार्यात असलेल्या संधींचा धांडोळा घेतील. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नें यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.

**<u>अफगाण-पाक हल्ला</u>**

अफगाणिस्तानने काल रात्री पाकिस्तानवर हल्ला केला. या आठवड्याच्या सुरुवातीला पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल हा हल्ला केल्याचे अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. डुरंड रेषेवर केलेल्या या हल्ल्यात पाकिस्तानच्या 19 चौक्या, दोन तळ ताब्यात घेण्यात आल्याचं आणि 55 पाकिस्तानी सैनिक मारले गेल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>सेबी</u>**

भारतीय सुरक्षा आणि विनिमिय मंडळ म्हणजेच सेबीने नियमन केलेल्या संस्थांनी समाज माध्यमांवर रोखे बाजाराशी संबंधित माहिती प्रसारित करताना त्यांचे नोंदणीकृत नाव आणि नोंदणी क्रमांक ठळकपणे नमूद करण्याचे निर्देश दिले आहेत. सेबीने काल एका परिपत्रकाद्वारे निर्देश दिले असून हे आदेश स्टॉक ब्रोकर्स, पोर्टफोलिओ मॅनेजर, म्युच्युअल फंड वितरकांसह मध्यस्थ, दलाल यांनाही लागू होणार आहे. येत्या एक मे पासून हे नियम लागू होणार आहेत.

**<u>बॅडमिंटन</u>**

जर्मनीत सुरू असलेल्या जर्मन सुपर थ्री हंड्रेड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किंदम्बी श्रीकांतचा पराभव झाल्याने भारताचे आव्हान संपुष्टात आलं आहे.  पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत चायनीज खेळाडूकडून सरळ सेटमध्ये पराभव पत्करावा लागला.

**<u>क्रिकेट-टी-20</u>**

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'सुपर एट' फेरीत, काल चेन्नईत झालेल्या सामन्यात, भारतीय संघाने झिम्बाब्वे संघाचा 72 धावांनी पराभव केला. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत 257 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वे संघाला 20 षटकांत 6 गडी बाद 184 धावा करता आल्या. याच स्पर्धेच्या अहमदाबाद मध्ये झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाने वेस्ट इंडिज संघाचा 9 गडी राखून पराभव केला. दरम्यान, सुपर एट मध्ये आज कोलंबोत, इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात लढत होणार आहे.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.